# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६८०४७,८६००२८५८५७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/१३/विवि/५५/२०२३
दिनांक : ०१.०४.२०२३

प्रति,
मा.प्राचार्य/विभाग प्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

**विषय : डिपेक्स २०२३ चे आयोजनास भेट देण्याबाबत.**
**संदर्भ :** कु. सावनी सामदेकर, महानगरमंत्री, अखिल भरतील विद्यार्थी परिषद विदर्भ प्रांत यांचे पत्र क्र.निरंक दिनांक ३१.०३.२०२३

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदे तर्फे डिपेक्स २०२३ चे आयोजन दिनांक ७ ते ९ एप्रिल, २०२३ या दरम्यान सिपना अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे संपन्न होणार असल्याबाबत संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात आलेले आहे.

करीता आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनींना डिपेक्स २०२३ ला दिनांक ७ ते ९ एप्रिल, २०२३ दरम्यान भेटी देण्यासंदर्भात सूचना द्याव्या, ही विनंती.

आपला विश्वासू,

**(डॉ.राजीव बोरकर)**
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**सहपत्र :** अखिल भरतील विद्यार्थी परिषद विदर्भ प्रांत यांचे पत्र क्र.निरंक दिनांक ३१.०३.२०२३

**प्रतिलिपी :**
१. मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
२. प्र.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
३. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद
विदर्भ प्रांत
डिपेक्स 2023
DIPEX 32 सृजन 2023
आयोजक
AKHIL BHARTIY VIDYARTHI PARISHAD
सृजन
छात्र शक्ती सदन 403, व्यंकटेश रेसिडन्सी, एकविरा मंगल कार्यालय समोर, चुनाभट्टी, अमरावती. 444605 | संपर्क - 7499913354

प्रति, दिनांक - ३१/०३/२०२३

डॉ. राजीव बोरकर

संचालक विद्यार्थी विकास विभाग , संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

विषय – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील सर्व महाविद्यालयांनी डिपेक्सला भेट देण्या संदर्भात

मा. महोदय ,

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि सृजन ट्रस्ट दर वर्षी डिपेक्स चे आयोजन करत असते. तंत्रज्ञानाद्वारे राष्ट्र अग्रेसर व्हावे यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने १९८६ साली सांगली येथे डिपेक्स स्पर्धा सुरु केली.डिपेक्स महाराष्ट्रातील सर्व तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी विद्यार्थांमध्ये चर्चित असलेले नाव आहे.डिपेक्स मध्ये हजारो विद्यार्थी प्रत्येक वर्षी सृजनशीलता तसेच तांत्रिक ज्ञान प्रकल्पांच्या माध्यमातून प्रदर्शित करते. मागील ३१ वर्षांच्या प्रवासात डिपेक्सने समाजाला उद्योजक,कुशल प्रशासक आणि समाजातील समस्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोडवण्यासाठी सतत संशोधन करण्याची प्रेरणा दिली. डिपेक्स हे महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील अभियांत्रिकी/तंत्रज्ञान तसेच कृषी क्षेत्रातील डिप्लोमा, पदवी, PG च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रकल्पांचे प्रदर्शन आणि स्पर्धा आहे.

या स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे नाविन्यापूर्ण प्रकल्प शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ,नामवंत उद्योगपती,प्रतिष्ठित उद्योजक आणि समाजातील सर्व घटकांना दाखवण्याची संधी मिळते. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देण्याचा डिपेक्स चा प्रयत्न आहे.डिपेक्स हे उद्योग-महाविद्यालय-समाज संवादाचे एक अनोखे व्यासपीठ बनले आहे. पूर्व राष्ट्रपती भारत रत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, शास्त्रज्ञ डॉ.विजय भटकर, डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे, श्री.अभय फिरोदिया, श्री.मधुर बजाज या सारख्या नामवंत शास्त्रज्ञ आणि उद्योजकांनी डिपेक्सला भेट दिली आहे.

या वर्षी ३२ वे डिपेक्स हे ७ ते ९ एप्रिल २०२३ दरम्यान सिपना अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे संपन्न होणार आहे.या स्पर्धेत दोनशे प्रकल्पांच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील हजारो विद्यार्थी सहभागी होणार आहे.या राज्यस्तरीय डिपेक्सचे प्रचार व प्रसार करण्यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने प्रत्येक महाविद्यालयात डिपेक्स एक्सप्रेसचे आयोजन केले आहे. या डिपेक्स एक्सप्रेसच्या माध्यमातून डिपेक्सची माहिती विद्यार्थांपर्यंत पोहोचवणार आहे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आपणास विनंती करते कि आपण संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील सर्व महाविद्यालयांना डिपेक्सला ७ ते ९ एप्रिल २०२३ दरम्यान भेट देण्यासाठी सूचना द्याव्या.

धन्यवाद!

आपली

कु. सावनी सामदेकर
(महानगरमंत्री ,अभाविप)